# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियत, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## निवडणूक विभाग

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५

जावक क्रमांक/गो.वि./नि.वि/१८६/२०२२ दिनांक ३०/०८/२०२२

## अधिसुचना

सर्व संबंधीतांना सुचीत करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 अन्वये अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यासमंडळ निवडणूक – 2022 च्या अनुषंगाने 1) प्राचार्य U/s (28)(2)(o), 2) व्यवस्थापन सदस्य U/s (28)(2)(p), 3) महाविद्यालयीन अध्यापक U/s (28)(2)(r), 4) विद्यापीठ अध्यापक U/s (28)(2)(s), 5) नोंदणीकृत पदवीधर U/s (28)(2)(t), 6) अध्यापक U/s (32)(3)(g) व 7) संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था मधील विभाग प्रमुख U/s (40)(2)(c) यांचे निवडणूकीकरीता दि. 02/08/2022 पर्यंत नामनिर्देशन पत्रे मागविण्यात आलेले होते.

उपरोक्त नमुद दिनांकापर्यंत प्राप्त विविध प्राधिकरणांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक 07-08-2022 व दिनांक 08-08-2022 रोजी करण्यात येवून छाननीअंती वैध व अवैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर नामनिर्देशन पत्राच्या वैध व अवैधतेबाबत दि. 11-08-2022 रोजी मा.कुलगुरू महोदयांकडे अपील दाखल करण्यास्तव कळविलेले होते. त्याअनुषंगाने उक्त दिनांकापर्यंत मा.कुलगुरू महोदयांकडे प्राप्त अपीलावर दिनांक 17-08-2022 रोजी प्रत्यक्ष सुनावणी घेण्यात येवून सुनावणीअंती मा.कुलगुरू महोदयांनी अपीलावर दिलेल्या निर्णयाची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. विविध प्राधिकरणाकरिता उमेदवार असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी अधिसुचना क्र. गो.वि./नि.वि./123/2022, दिनांक 20/08/2022 अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली होती. तथापि अधिसभेतील विद्यापीठ अध्यापक या निर्वाचन गणातील खुला प्रवर्गातील उमदेवार कांबळे उत्तमचंद तुकाराम यांचे नामनिर्देशन पत्र अवैध ठरविण्यात आल्यामूळे कांबळे उत्तमचंद तुकाराम यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक 5240/2022 वर मा.उच्च न्यायालयाने दिनांक 30/8/2022 रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार कांबळे उत्तमचंद तुकाराम यांचे नाव विद्यापीठ अध्यापक निर्वाचण गटाचे खुला प्रवर्गातील वैध उमेदवारांच्या यादीत मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधिन राहून समाविष्ट करण्यात येत असून सुधारित वैध उमेदवारांची अंतिम यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**मा.कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने**

**(डॉ. अनिल हिरेखन)**
कुलसचिव तथा निवडणूक निर्वाचण अधिकारी
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली